आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता

२९ सप्टेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया अभियानामुळे भारत जगातलं महत्त्वाचं उत्पादन केंद्र बनल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बातमधे प्रतिपादन
- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्रातल्या ११ हजार २४० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण
- शासकीय औद्योगिक संस्थांमधल्या तरुणींना स्वरक्षणाचं मोफत प्रशिक्षण देण्यासाठी 'हर घर दुर्गा' अभियानाला उद्यापासून प्रारंभ
- जम्मू-कश्मीर विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यासाठीच्या प्रचाराची सांगता/ १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार

**आणि**

- भारत आणि बांग्लादेश यांच्यात सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याचा तिसऱ्या दिवशीचा खेळ पावसामुळे रद्द

<><><><><>

केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया या महत्वाच्या अभियानाला दहा वर्ष पूर्ण होत असल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मध्ये केलं. प्रधानमंत्र्यांनी आकाशवाणीवर आज मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. या कार्यक्रमाचा हा ११४ वा भाग होता. या अभियानानं गरीब, मध्यमवर्ग तसंच सूक्ष्म, लघु, आणि मध्यम उद्योग क्षेत्राला मोठा लाभ झाला. या अभियानामुळे आज भारत उत्पादनाचं केंद्र बनला आहे, असं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात भंडारा जिल्ह्यातल्या पारंपरिक रेशीम उद्योगाचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भंडारा टसर सिल्क हॅण्डलूम नावानं ओळखल्या जाणाऱ्या या उद्योगात महिलांचा सर्वाधिक सहभाग आहे. या रेशीम उत्पादनाला लोकप्रियता

मिळत असून स्थानिक समुदायही सक्षम होतो असल्याचं सांगून, हाच मेक इन इंडियाचा गाभा असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

येत्या २ ऑक्टोबरला स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीलाही १० वर्षं पूर्ण होत आहे. स्वच्छता मोहिम नैमित्तिक नाही, तर ते निरंतर चालणारं काम आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

आपल्या अलिकडच्या अमेरिका दौऱ्यात अमेरिका सरकारनं भारताला सुमारे ३०० प्राचीन कलाकृती परत केल्याची, आणि त्यातल्या कलाकृतींची तपशीलवार माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली.

देशातल्या नागरिकांची प्रतिभा आणि सृजनशक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सुरू केलेल्या Create in India या उपक्रमाची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. याअंतर्गत आखलेल्या २५ आव्हानांमध्ये सहभागी व्हावं, आणि आपली सर्जनशीलता जगासमोर आणावी, यासाठी वेव्ह्ज इंडिया डॉट ओआरजी (wavesindia.org) या संकेतस्थळाला भेट द्यावी, असं आवाहनही त्यांनी केलं.

मन की बात या कार्यक्रमाला दहा वर्षं पूर्ण होत असल्याबद्दल त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या…..

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री (१० वर्षांचा प्रवास)**

मन की बात साठी देशाच्या कानाकोपऱ्यातील कोट्यवधी श्रोत्यांनी माहिती उपलब्ध करून दिली, हे श्रोतेच या कार्यक्रमाचे खरे सूत्रधार आहेत अशा शब्दांत त्यांनी श्रोत्यांची प्रशंसा केली.

मन की बातच्या प्रसारणाची धुरा सांभाळणाऱ्या आकाशवाणी, दूरदर्शनसह, हा कार्यक्रम प्रसारित करणाऱ्या आणि त्यावर विविध कार्यक्रम रचणाऱ्या इतर दूरचित्रवाहिन्या आणि युट्युबर्सचेही त्यांनी आभार मानले.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या ११ हजार २४० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं.

**कॅप्सूल -**

*(पुण्यातल्या जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मेट्रो सेवेचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते झालं. त्याचबरोबर २ हजार ९५५ कोटी रुपये खर्चाच्या पुणे मेट्रो स्वारगेट- कात्रज विस्ताराची पायाभरणीही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली. पुण्यातल्या भिडेवाडा इथल्या सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेच्या स्मारकाचं भूमिपूजनही मोदी यांनी केलं. तसंच, राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत बिडकीन औद्योगिक क्षेत्राचं लोकार्पणही मोदींच्या हस्ते आज झालं. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सोलापूर विमानतळाचे उद्घाटनदेखील झालं. महाराष्ट्राने आता नवे संकल्प आणि मोठी लक्ष्यं निश्चित करायला हवीत असं ते म्हणाले…..*

**होल्ड--बाईट--प्रधानमंत्री पुणे…)**

आता पुण्यासह छत्रपती संभाजीनगर इथं अनेक उद्योग येत असून, त्याद्वारे स्थानिक पातळीवर अनेक संधी उपलब्ध होणार असल्याचं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

शासकीय औद्योगिक संस्थांमधील तरुणींना स्वरक्षणाचं मोफत प्रशिक्षण दिलं जाणार आहे. त्या अनुषंगानं, ‘हर घर दुर्गा’ अभियानाचा प्रारंभ उद्या लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या हस्ते होत असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री

मंगल प्रभात लोढा यांनी आज दिली. मुंबईच्या कुर्ला इंथल्या शासकीय औद्योगिक संस्थेत यासाठी आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

भारत आणि बांग्लादेश यांच्यात कानपूर इथं सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, पावसामुळे मैदान ओलं झाल्यानं आज तिसऱ्या दिवसाचा खेळ रद्द केला गेला. पावसामुळे काल दुसऱ्या दिवशी एकही चेंडू टाकला गेला नव्हता तर, पहिल्या दिवशी केवळ ३५ षटकांचा खेळ झाल्यानंतर खेळ थांबवावा लागला होता. त्यावेळी बांग्लादेशानं ३ बाद १०७ धावा केल्या होत्या. दोन सामन्यांच्या या मालिकेत भारत पहिला सामना जिंकून १-० नं आघाडीवर आहे.

<><><><><>

जम्मू-कश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार आज संपला. या अंतिम टप्प्यात ४० मतदार संघांमधे येत्या १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. त्यासाठी ४१५ उमेदवार रिंगणात असून, ३९ लाख १८ हजारापेक्षा जास्त मतदार त्यांचं भवितव्य ठरवणार आहेत.

<><><><><>

बीसीसीआय, अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या, बंगळुरू इथल्या नव्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचं आज उद्घाटन झालं. बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स हे या अकादमीचं नाव असून, इथं जागतिक दर्जाच्या क्रीडाविषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

क्रीडा विज्ञान पुढं नेणं आणि भारतीय क्रीडा परिसंस्थेचा विस्तार करणं हा या अकादमीचा उद्देश असल्याचं बीसीसीआयनं म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनिता विल्यम्स आणि अंतराळवीर बॅरी विलमोर यांना परत आणण्यासाठी नासा या अंतराळ संशोधन संस्थेनं आज अमेरिकेच्या फ्लोरिडा इथल्या केप कॅनवरल स्पेस फोर्स स्थानकावरून स्पेस एक्स हे यान अंतराळात सोडलं. हे यान अंतराळ कक्षेत सुरक्षित पोहोचलं आहे. यात अंतराळवीर निक हेग आणि अलेक्झांडर गोर्बुनोव रवाना झाले आहेत. सुनिता विल्यम्स आणि बॅरी विलमोर यांना या यानातून परत आणलं जाणार आहे.

<><><><><>

तामिळनाडूमध्ये राज्याचे युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री उदयनिधी स्टालिन यांनी आज संध्याकाळी राजभवनात आयोजित समारंभात उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांच्यासोबत सेंथिल बालाजी, गोवी चेझियान, आर.राजेंद्रन आणि एस.एम.नासर या चार जणांनीही मंत्री म्हणून शपथ घेतली.

<><><><><>

शेतकऱ्यांच्या यशोगाथेतूनच समाज, राज्य आणि देश उभा राहतो, त्यांच्याशिवाय देशाला भविष्य नाही, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. वर्ष २०२० ते २०२२साठीच्या एकंदर ४४८ राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचं वितरण राज्यपालांच्या हस्ते आज मुंबईत झालं, त्यावेळी ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांना राज्यातल्या शेतकऱ्यांचा पूर्ण पाठिंबा होता, त्यामुळेच ते इतकं महान कार्य करू शकले, असं राज्यपाल म्हणाले.

<><><><><>

हे सर्वसामान्यांचं सरकार असून लोकांच्या हाताला काम देणं, माझी लाडकी बहीण सारखी योजना आणण्याचं काम महायुती सरकारनं केलं आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज सातारा इथं म्हणाले. साताऱ्यात पाटण विधानसभा मतदारसंघातल्या विविध कामांचं भूमीपूजन आणि उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

लोकनेते बाळासाहेब देसाई बहुद्देशिय कृषी संकुलाचं उद्घाटन आणि नगरोत्थान योजनेतून मंजूर झालेल्या पाणी योजनेचं भूमीपूजनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

ईडी, सीबीआयच्या माध्यमातून विरोधकांना अडकवणं हेच भाजपाचं धोरण असल्याची टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. नागपूर जिल्ह्यात कळमेश्वर कडील तळ्याच्या पाळीवर उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचं उदघाटन आज ठाकरे यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते.

त्याआधी ठाकरे यांनी नागपुरातल्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी शिवसेनेचे नागपूर जिल्हा संघटक मिलिंद देशमुख, उपजिल्हाप्रमुख पवन शर्मा, उपजिल्हाप्रमुख शरद भूषणवार तसंच इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या कथुआ जिल्ह्यातल्या एका गावात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान आज आणखी एका दहशतवाद्याला सुरक्षादलांनी ठार केलं. या कारवाईत आत्तापर्यंत दोन दहशतवादी ठार झाले आहेत, एका पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे, तर दोन अधिकारी जखमी झाले आहेत.